**ठळक बातम्या**

- विकसित भारत घडवण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी यावर भर द्यावा लागेल, अशी केंद्रीय कृषी मंत्र्यांची स्पष्टोक्ती

- महिलांना अधिक संधी उपलब्ध केल्यानं नौवहन क्षेत्रात नवोन्मेष आणि मजबुतीकरण वाढेल, असा केंद्रीय बंदर आणि नौवहन मंत्र्यांना विश्वास

- यंदाचे संसद रत्न पुरस्कार १७ खासदारांना जाहीर, राज्यातल्या ७ जणांचा समावेश

**आणि**

- अक्कलकोट इथं एका कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा तिचा आत्मा आहे. त्यामुळेच विकसित भारत घडवायचा असेल तर विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी यावर आपल्याला भर द्यावा लागेल, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. नागपूर इथे विकसित कृषी या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीवेळी ते बोलत होते.

विकसित, गरिबीमुक्त गाव हे आपल्या सरकारचं लक्ष्य असून त्यासाठी योग्य ती पावलं उचलली जात आहेत. कृषि क्षेत्रातल्या विविध संस्था स्वतंत्रपणे कार्य करत असून जर या संस्थांचा आपापसात समन्वय साधला आणि त्यांना योग्य दिशा दिली तर कृषिक्षेत्रात चमत्कार होऊ शकतो. त्यामुळे आता एक देश, एक राज्य, एक कृषी आणि एक पथक अशा योजनेची आपण घोषणा करत असल्याचंही चौहान यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील

शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच त्यांनी 'नॅशनल सॉईल स्पेक्ट्रल लायब्ररीचं' उद्घाटन केलं.

<><><><>

नौवहन उद्योगात महिलांना अधिक संधी उपलब्ध करुन दिल्यानं महिला सक्षमीकरणाचं उद्दिष्ट साध्य करतानाच नौवहन क्षेत्रात नवोन्मेष आणि मजबुतीकरणाला चालना मिळेल, असं केंद्रीय बंदर आणि नौवहन मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. नौवहन क्षेत्रातल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

"नौवहन उद्योगातील महिलांचं स्थान : कायापालट आणि शाश्वततेकडे वाटचाल" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाला नौवहन क्षेत्रातले आघाडीचे उद्योजक, वरिष्ठ अधिकारी, शैक्षणिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

<><><><>

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं लवकरच वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. या संदर्भात, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या शिष्टमंडळांचं नेतृत्व करणाऱ्या खासदारांची आणि सदस्यांची यादी जाहीर केली आहे.

त्यानुसार, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचा गट युएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देईल. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिकेला भेट देईल.

रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन युनियन, इटली आणि डेन्मार्कला भेट देणाऱ्या गटात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रियंका चतुर्वेदी यांचा समावेश आहे.

काँग्रेसचे शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचा गट अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देणार असून त्यात शिवसेनेचे मिलिंद देवरा यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस सहभागी झाले होते. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अंतर्गत निर्मित शस्त्रास्त्रांमुळं पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात आपण विजयश्री प्राप्त केली. या शस्त्रास्त्रांसाठी जगातून भारताकडे मागणी होत आहे, असं फडनवीस यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**होल्ड - बाईट- फडनवीस (१६ सेकंद)**

नागपुरात भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. सर्वजण भारतीय सैन्यासोबत आहेत, भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ आणि दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दाखवण्यासाठी, ही तिरंगा यात्रा आयोजित केली असल्याचं यावेळी बावनकुळे म्हणाले.

जालना शहरात आयोजित तिरंगा रॅलीत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, नारायण कुचे, आणि संतोष दानवे यांच्यासाह माजी सैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागा झाले. यावेळी रावसाहेब दानवे म्हणाले…

**होल्ड बाईट -रावसाहेब दानवे (२३ सेकंद)**

आमदार अर्जुन खोतकर म्हणाले…

**होल्ड बाईट -अर्जुन खोतकर (१६सेकंद)**

सेना दलातले सेना पदक प्राप्त माजी कॅप्टन भानुदास शिरसाट यांनी सांगितलं….

**होल्ड बाईट -भानुदास शिरसाट (२८ सेकंद)**

मुंबईत कांदिवली आणि बोरिवली इथं, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात फुलंब्री, सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड, **सांगली** जिल्ह्यात शिराळा इथं, तसंच वाशिम शहरातही आज तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**<><><><><>**

यंदाचे संसद रत्न पुरस्कार १७ खासदारांना जाहीर झाले असून त्यात महाराष्ट्रातल्या ७ खासदारांचा समावेश आहे. संसदीय लोकशाही मजबूत करण्याच्या दृष्टीनं संसदेत प्रश्न विचारणे, वादविवादात सहभाग आणि विधीविषयक कामात योगदान या निकषांवर प्राईम पॉईंट फाऊंडेशनतर्फे हे पुरस्कार दिले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, शिवसेनेचे श्रीरंग बारणे आणि नरेश म्हस्के, भाजपाच्या स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, आणि काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांची निवड यंदाच्या पुरस्कारांसाठी झाली आहे. तसंच अर्थविषयक आणि कृषीविषयक स्थायी समित्यांची निवडही पुरस्कारासाठी झाली आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट इथे आज पहाटे एका कापड कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जण मरण पावले आहेत. अक्कलकोट मार्गावरच्या एमआयडीसी परिसरात हा कारखाना आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केलं आणि संध्याकाळी साडे पाचच्या सुमाराला ही आग आटोक्यात आणली. या आगीत या कारखान्याचे मालक, त्यांचं कुटुंब आणि कामगार अशा ८ जणांचा मृत्यू झाला. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या आगीतून तीन जणांना बाहेर काढलं असून त्यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं सुरु असलेल्या सामन्यात पंजाब किंग्जनं राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २२० धावांचं आव्हान ठेवलं आहे. पंजाब किंग्जनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ५ गडी गमावून २१९ धावा केल्या. नेहाल वढ्रेरानं सर्वाधिक ७०, तर शशांक सिंगनं नाबाद ५९ धावांचं योगदान दिलं.

या धावसंख्येचा पाठला करताना राजस्थान रॉयल्सच्या यशस्वी जैसवाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी तडाखेबंद सुरुवात केली. वैभव ४० धावांवर बाद झाला. त्याच्या या जलद खेळीत ४ षटकार ४ चौकारांचा समावेश आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या १९ षटकात ५ बाद १९८ धावा झाल्या होत्या.

आजचा दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात होणार आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज आहे.

येत्या २५ मे पर्यंत कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. येत्या २२ मे च्या सुमाराला कर्नाटक किनारपट्टी जवळ पूर्व-मध्य अरबी समुद्रावर कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता असून, कमी दाबाचा हा पट्टा उत्तरेकडे सरकून आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्याच्या प्रभावामुळे राज्याच्या हवामानात लक्षणीय बदल होतील, असा अंदाज आहे.

राज्यात विशेषतः कोकण किनारपट्टीजवळ पुढले पाच दिवस वादळी वातावरणाची शक्यता असल्यामुळे, या काळात मच्छिमारांनी खोल समुद्रात जाऊ

नये, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या काळात ताशी ३५ ते ४५ किमी वेगाने वारे वाहतील, आणि वाऱ्याचा  वेग ताशी ५५ किमी पर्यंत वाढेल, असा अंदाज आहे.

उत्तर महाराष्ट किनारपट्टी भागातही येत्या २१ आणि २२ मे रोजी वादळी वातावरण राहील, असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**